भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(सकाळ)

जा.क्र.६१२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०१/०९/२०१७

**१) दाराचा कुलुप तोडुन आलमारीत ठेवलेले नगदी पैसे ,चांदीचा सामान व मोबाईलची चोरी . :–**

दिनांक ३०/०८/२०१७ चे ०९.०० वा. ते ३१/०८/२०१७ चे ०९.३० वा. दर. यातील फिर्यादी चैतनेश्वर कारू निखाडे वय ५३ वर्ष रा. फ्रेन्डस कॉलोनी खात रोड भंडारा, हा आपले कुटुंबासह दाराला कुलुप लावुन गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीचे राहते घराचे मागील दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करून दक्षिण बाजुचे बेडरूमधील आलमारीचा ताला तोडुन त्यामधुन २,०००/रु च्या ०३ नोटा, ५००/रु चे १० नोटा, १००/रु च्या १४० नोटा, दोन चांदीचे जोडवे २० ग्रॅम कि. ६००/रु, हळदी कुंकुचा चांदीचा करंडा वजन १०० ग्रॅम कि. ३,०००/रु , नोकिया कंपनीचा मोबाईल कि. १,०००/रु चा असा एकुन २९,६००/रु चा माल कुनिही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**२) मोबाईलची चोरी. :–**

दिनांक ३०/०८/२०१७ चे १८.०० वा. दर. पर्यत यातील फिर्यादी प्रशांत जगदिश वालदेव वय ४१ वर्ष रा. जांब ह.मु. बसस्टॉप मागे बेला हे आठवडी बाजारात भाजीपाला घेत असतांना त्याचे शर्टचे वरचे खिशातुन ०१ विवो कंपनीचा मोबाईल कि. १३,४९९/रु चा कोणीतरी अज्ञात चोराने खिशातुन काढुन चोरून नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खाडे पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**३)मंगळसुत्र चोरी . :–**

दिनांक ०६/०८/२०१७ चे १०.३० वा. ते ११.४५ वा. दर. फिर्यादी ही नागपुर ते भंडारा बस मध्ये बसली व मौदा येथे पर्स बघितले तेव्हा, मंगळसुत्र होते परंतु भंडारा येथे आई कडे आदर्श कॉलोनी भंडारा येथे गेल्यावर पर्श मधील १ सोन्याचे मंगळसुत्र १५,७१० ग्रॅम कि. ३९,९२३/रु चा माल दिसला नाही, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून ,पोस्टे. गनेशपेठ नागपुर अप क्र. ००/१७ कलम ३७९ भादवी. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये नंबरी गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.गायधने पो.स्टे भंडारा हे करीत आहेत.

**४)मोटार सायकलच्या धडकेत महिलेचा मृत्यु. :–**

दिनांक ३१/०८/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन ,घरासमोर म्हशी हाकलत असलेली, फिर्यादीची आई सौ. अनुसया रामदास राणे वय ५५ वर्ष रा. चिचेली हिला मोटार सायकलने धडक मारून तिच्या मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सुरविर रामदासजी राणे वय २८ वर्ष रा. चिचोली यांचे रिपोर्ट तोंडी वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे २७९,३०४ (अ) भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी.जाधव पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

५) होंडाई चार चाकी वाहनाच्या धडकेत तिन जखमी. :—

दिनांक ३१/०८/२०१७ चे १४.४५ वा. दर. यातील जखमी मच्छीन्द्र हेमराज लेदे वय २३ वर्ष रा. चोहा पहेला हा आपले दोन मित्र प्रवेश चोपकर वय २३ वर्ष रा. सिल्ली व अनिकेत मते वय २३ वर्ष रा. इंदुरखा सोबत मोटार सायकल क्र.एमएच ३६ यु ६२९६ ने तिन सिट रेंगेपार कोठा गावा कडुन खेडेपार रोडने बांम्पेवाडा येथे जातांनी ,मासलमेटा रेंगेपार लाखनी सालेभाटा चौकानी रस्त्यावर लाखनी कडुन सालेभाटा कडे जाणाऱ्या रोडने चार चाकी होंडाईचे कार चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन मोटार सायकलने धडक दिल्याने तिघांनाही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. वरुन रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे २७९,३३७,३३८, भादंवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. टेभुर्णीकर पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

७) अवैध दारु/ जुगार अडयावर धाडी . :—

दिनांक ३१/०८/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. तुमसर ,सिहोरा,गोबरवाही येथे दारू अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २३ लिटर ४०० मिलीलीटर हातभटटी दारु + मोटार सायकल किंमती २१,५२० /रु तसेच जुगारातुन १३२/रु चा माल असा एकुन २१,६५२/रु चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.